ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

# मानवी हक्कांची सध्यस्थिती

प्रा. काळे एस. ए.,
क्रां. व्ही. एन नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे कला,
व वाणिज्य महाविद्यालय,
दिंडोरी, नाशिक

***Abstact :***

*मानवाला काही नैसर्गिक हक्क असतात ते हक्क देशातील सर्व नागरिकांना कोणताही भेदभाव (धर्म, वंश, लिंग,जात) न करता मिळाले पाहिजेत यातून मानवी हक्काची कल्पना पुढे आली.मानवी हक्क कायदयाचे महत्व व लोकप्रियता लक्षात घेता अशा प्रकारचे कायदे, त्यांचे मुळ आणि काळानुसार त्यात झालेला बदल यावर अधिक लक्ष केंद्रीत न करता त्या कायदयांची अंमजबजावणी योग्य रितीने कशी होईल याकडे लक्ष देणे महत्वाचे आहे*

**Key Word :** मानवी हक्क, जागतिक शांतता, पुरुष प्रधान संस्कृती, राष्ट्रीय मानवी हक्क आयोग,

**मानवी हक्कांची सध्यस्थिती –**

मानवाला काही नैसर्गिक हक्क असतात ते हक्क देशातील सर्व नागरिकांना कोणताही भेदभाव (धर्म, वंश, लिंग,जात) न करता मिळाले पाहिजेत यातून मानवी हक्काची कल्पना पुढे आली. जॉन लॉक ने जीवित, वित्त व स्वातंत्र्याच्या हक्कांना नैसर्गिक हक्क मानले. 1215 ची मॅग्नाचार्टा सनद, 1679 चा बंदी प्रत्याक्षीकरण अधिनियम, 1628 चा पिटीशन ऑफ राईटस, 1689 चा बील ऑफ राईटस, 1776 चे अमेरीकन स्वातंत्र्याचे घोषणापत्र, 1789 ची फ्रेच राज्यक्रांती या बाबी मानवी हक्कांच्या प्राप्तीसाठी कराव्या लागलेल्या संघर्षाच्या इतिहासातील महत्वाचे टप्पे आहेत. मात्र 20 व्या शतकात जगात दोन महायुध्दे झाली. 1945 मध्ये जागतीक शांतता प्रस्थापीत होण्यासाठी UNO ची स्थापना झाली. UNO च्या स्थापनेनंतर मानवी अधिकारांच्या प्रश्नांना विशेष महत्व प्राप्त झाले. मानवी हक्क व मुलभुत अधिकार मिळाल्याशिवाय आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता प्रस्थापीत होऊ शकणार नाही म्हणुन मानवी हक्कांचे रक्षण करुन मानवी प्रतिष्ठा अबादीत राखण्याचा निर्धार UNO त केला गेला. मानवी हक्क आयोगाच्या मसुदयात बदल करुन UNO ने 10 डिसेंबर 1948 या दिवशी मानवी हक्कांचा स्वीकार केला. 10 डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणुन जगभर पाळला जातो. UNO च्या मानवी हक्कांच्या घोषणापत्रात 30 अनुच्छेद असुन त्यात राजकीय, सामाजिक, आर्थिक तसेच नागरी हक्क समाविष्ठ करण्यात आले आहेत. विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य जीवीत स्वातंत्र्य, उपजीवीकेचे स्वातंत्र्य, संचार व संघटना, समतेचा अधिकार, धर्म, स्वातंत्र्य विवाह स्वातंत्र्य इ. चा मानवी हक्कामध्ये समावेश होतो.

भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात कलम 12 ते 35 नुसार भारतीय नागरिकांना मुलभुत अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तसेच चौथ्या भागात कलम 36 ते 51 मध्ये राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्वाचा समावेश करण्यात आला आहे. भारतीय संविधानाने मुलभुत अधिकारांना मान्यता दिल्यानंतर या अधिकाराव्दारे भारतातील धार्मिक, भाषिक, प्रांतिक, जातीय तेढ नाहीशी होईल अशी अशा होती त्या दृष्टीने अनेक कायदेही करण्यात आले. मात्र या कायदयाची अंमलबजावणी योग्य रितीने झाली नाही उदा. घटनेनुसार अस्पृश्यता(जातिव्यवस्था) नष्ट झाली. वास्तवात तीने उग्र रुप धारण केले आहे. प्रत्येक जातीच्या जातीनिहाय संघटना निर्माण झालेल्या आहेत. त्यांच्या राजकारणात मानवी हक्काचे मोठया प्रमाणात हनन होत आहे. समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यासाठी आणि मानवाला सुखकर जीवन जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य या पाच मुलभुत गरजा भागण्याची आवश्यकता असते. मात्र तिसऱ्या जगातील राष्ट्रात या गरजांचीही परिपुर्ती होत नाही. परिणामी भुकबळी व इतर आरोग्याच्या समस्या मोठया प्रमाणात निर्माण होतात. उच्च शिक्षणाचे प्रमाण तर या राष्ट्रात कमालीचे कमी आहे. ही परिस्थिती विकसीत राष्ट्रातही दिसते. भारतात सरकारी आकडेवारी नुसार दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण कमी दिसत असले तरी वास्तवात हे प्रमाण जास्त आहे. उच्च वर्णियांकडुन दलित व आदिवासींचा छळ मोठया प्रमाणात होत आहे. दिवसेंदिवस त्याचे प्रमाण वाढत आहे. वेश्या व्यवसायाचे प्रमाण वाढत आहे. शहरानजीक झोपडपट्टीचे प्रमाण वाढत आहे यातुनच आरोग्य व शिक्षणाच्या समस्येत वाढ होत आहे. हॉटेल व्यवसाय व छोटया मोठया उदयोगात बालमजुरीचे प्रमाण वाढत आहे. याचाच अर्थ संविधानाने कलम 23 व 24 नुसार दिलेल्या शोषणाविरुध्द मुलभुत हक्कांचे मोठया प्रमाणात उल्लंघन होत आहे.

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात मानवाचा गरजा प्रचंड वाढल्या परंतु गरजा भागविणारी साधने वाढली नाहीत म्हणुनच की काय मानवी हक्कांचा मोठया प्रमाणात संकोच होऊ लागला. म्हणूनच पुन्हा रुसोच्या “निसर्गाकडे परत चला” म्हणजेच निसर्ग नियमांनी नियंत्रीत व्हा या विधानाची आठवण होते. महात्मा गांधीनी चंगळवादाच्या आहारी न जाता गरजा मर्यादित करण्याचा सल्ला दिला परंतु फक्त जयंती व पुण्यतिथीच्या दिवशीच गांधीवादाची आठवण होते. हिंसाचार, दंगल, दहशतवाद, जाळपोळ इत्यादी मुळे मानवी हक्कांचे मोठया प्रमाणात उल्लंघन होत आहे याचे भान ना दहशतवादयांना ना राज्यकर्त्यांना, उल्फा, बोडो, एल. टी. टी. ई. काश्मिर मधील दहशतवादी कारवायामुळे मोठया प्रमाणात मानवी हक्कांचे उल्लघन होत आहे. 1975 ची आणिबाणीची घोषणा, इंदिरा गांधीच्या हत्त्येनंतर शीखविरोधी झालेली दंगल किंवा 2002 मधील गुजरातमधील दंगल यातुन मोठया प्रमाणात जीवित हानी झाली. मानवी हक्क आणि मुलभुत हक्क रक्षणाचे कायदे असले तरी ते केवळ कागदावरच प्रबळ दिसतात. त्यांची प्रत्यक्षात काटेकोरपणे अंमलबजावणी होत नाही.

पुरुष प्रधान संस्कृतीने स्त्रियांवर कित्त्येक वर्षापासुन अन्याय केला. चुल आणि मुल इतकेच तिचे कार्यक्षेत्र ठेवले. अलिकडील काही घटनावरुन तर तिच्या जगण्याचा अधिकारावरच मर्यादा आणली, इतकेच नव्हे तर जन्माला येण्यापुर्वीच तिच्या हत्येची कित्त्येक उदाहरणे पहावयास मिळतात. जवळपास 60 ते 70 टक्के स्त्रिया

घरगुती छळाला बळी पडतात. 20 मिनीटाला एक स्त्री आत्महत्या करते. 77 मिनीटाला एक स्त्री हुंडाबळीचा शिकार होते. दर हजारी पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण 700 ते 750 पर्यत खाली आल्याचे काही राज्यात पहावयास मिळते. याचाच अर्थ स्त्रियांचे मुलभुत मानवी हक्क नाकारले जातात.त्यांना पुरुषाच्या बरोबरीने समानतेची वागणुक मिळत नाही.

21 वे शतक हे विज्ञान तंत्रज्ञानाबरोबर जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाला प्रोत्साहन देणारे शतक आहे. या शतकात पर्यावरणीय जाणिवेबरोबर माहिती अधिकाराची जाणीवही मोठया प्रमाणात निर्माण होत आहे. त्याच बरोबरीने मानवी हक्काचीही जाणीव होणे महत्वाचे आहे. अन्यथा पुन्हा जग युध्दखोर प्रवृत्तीकडे वाटचाल करील आणि अल्बर्ट आईनस्टाईन यांनी म्हटल्याप्रमाणे "तिसरे महायुध्द कसे असेल याविषयी मला माहिती नाही, परंतु चौथे महायुध्द दगडांनी खेळावे लागेल" असे होऊ नये म्हणुन प्रत्येकाने मानवी हक्क मान्य करुन मानवतेला प्राधान्य दयावे यातच मानवाचे कल्याण आहे.

भारतात 14 मे 1993 रोजी लोकसभेत मानवी हक्क आयोगाविषयीचे विधेयक सादर केले गेले. आयोगाची स्थापना 12 ऑक्टोबर 1993 रोजी करण्यात आली. मानवी हक्क कायदयाच्या कलम 12 अन्वये आयोगाच्या कार्यपध्दती विषयी माहिती देण्यात आली आहे. आयोगाचे प्रथम कर्तव्य म्हणजे मानवी हक्कांच्या पायमल्ली विषयीच्या तक्रारीची दखल घेवुन चौकशी करणे, अथवा सरकारी नोकराकडुन अशा मानवी हक्क कायदयाचा भंग झाल्यास त्या विषयीच्या तक्रारीची चौकशी करणे तसेच मानवी हक्क कायदयाच्या भंगाविषयीच्या कोणत्याही बाबींमध्ये अथवा कार्यपध्दतीमध्ये हस्तक्षेप करुन अशा कायदयाची पायमल्ली न होवु देण्याची खबरदारी घेणे.

मानवी हक्क संरक्षणामध्ये NGO (अशासकीय संस्था) ची भुमिका महत्वाची ठरलेली आहे. वास्तविक पाहता मानवी हक्कांचा संरक्षणाची कल्पनाच अशा अशासकीय स्वयंसेवी संस्थाच्या पुढाकाराने जन्माला आलेली दिसते 1993 च्या मानवी हक्क आयोगाच्या कायदयान्वये, राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने अशा प्रकारचे काम करण्याचा स्वयंसेवी संस्थांना अधिक प्रोत्साहन देण्याची बाब अधोरेखित केली आहे. NGO हे राष्ट्रीय मानवी हक्क आयोगास कायम मदत करु शकतात तसेच आयोगाच्या कार्यपध्दती विषयी कठोर टिकात्मक परिक्षण करु शकतात आणि म्हणुनच अशा स्वयंसेवी संस्थांना बरोबर घेवुन मानवी हक्क आयोगाने काम करणे अपेक्षित आहे. आयोगाचे बहुसंख्य उपक्रम स्वयंसेवी संस्थांच्या मदतीशिवाय पुर्ण होत नाही. किंबहुना अशा संस्थांचा सल्ला आयोगाचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी वेळोवेळी घेतलेला दिसतो. सार्वजनिक हिताच्या विरोधी अनेक तक्रारी स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातुन आलेल्या दिसतात.

सद्यस्थितीत मानवी हक्क कायदयाचे महत्व व लोकप्रियता लक्षात घेता अशा प्रकारचे कायदे, त्यांचे मुळ आणि काळानुसार त्यात झालेला बदल यावर अधिक लक्ष केंद्रीत न करता त्या कायदयांची अंमजबजावणी योग्य रितीने कशी होईल याकडे लक्ष देणे महत्वाचे आहे . थोडक्यात मानवी व मूलभूत हक्कांचे उल्लंघन होवु नये म्हणुन सरकार न्यायसंस्था, राष्ट्रीय मानवी हक्क आयोग आणि स्वयंसेवी संस्था यांनी जागृत राहिले पाहिजे.

संदर्भ

1. राज्यशास्त्र कोश
2. Human Right Commission Report
3.. Human Right Wikipedia

( हा लेख जे. ए. टी महाविद्यालय मालेगाव या ठिकाणी १०, ११ डिसेंबर २०१२ रोजी झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात सादर करण्यात आला होता. )